सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

DGP-D31/2/2025-DESK 31/Composite Bill Payment System                    दिनांक ई स्वाक्षरीत नमूद
दि. 23/09/2025

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्र.बीजीटी-२०२५/प्र.क्र.०८/अर्थ-१, दि.११/०८/२०२५

विषय :- सर्व शासकीय कार्यालयांच्या विदयुत देयकासंदर्भात Composite Billing प्रणाली राबविण्याबाबत..

******

उपरोक्त संदर्भाधिन विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महावितरण कंपनीने एकाच यंत्रणेतील विविध वीज ग्राहकांसाठी एकत्रित विद्‌युत देयक प्रणाली (Composite Bill Payment System) तयार केलेली आहे. या नवीन प्रणालीनुसार एकत्रित विद्‌युत देयके सादर करण्यासाठी प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त असलेल्या विविध क्षेत्रीय कार्यालयांचे समुह (Group) तयार करुन, त्या समुहातील एका कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात यावे. त्या नोडल / आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत त्या समुहातील सर्व शासकीय कार्यालयांची विद्‌युत देयकांचे प्रदान करण्यात यावे व त्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालय, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई व जिल्हा स्तरावर कार्यरत क्षेत्रीय कार्यालयांचे कशाप्रकारे समुह (Group) तयार करता येतील याबाबतची माहिती तातडीने शासनास पाठविण्याबाबत महाराष्ट्र शासन गृह विभाग यांनी त्यांचे क्र.बीजीटी-२०२५/प्र.क्र.०८/अर्थ-१, दि.११/०८/२०२५ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. (प्रत संलग्न)

त्यास अनुसरुन, पोलीस महासंचालक कार्यालयाअतंर्गत असलेल्या सर्व घटक कार्यालयातील विदयुत मीटरची माहिती शासनास सादर करावयाची असल्याने आपल्या व आपल्या अधीपत्याखालील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधीनस्त पोलीस कार्यालये, पोलीस वसाहतीमधील (पोर्च व इतर बाहेरील बाजूची विदयुत देयके), पोलीस स्टेशनमधील सर्व विदयुत मीटरची सवस्तिर माहिती दि.३०/०९/२०२५ पर्यंत नचुकता खालील तक्त्यामध्ये या कार्यालयातील कार्यासन क्रमांक-३१ यांच्या ई-ऑफिसवर पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिकारी यांचे नाव | मीटर क्रमांक | मीटर ज्या ठिकाणी आहे ते कार्यालय / पोलीस स्टेशन / पोलीस वसाहतीचे नाव |
|---|---|---|---|
| १. | | | |

(अभिषेक त्रिमुखे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे,

संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / वाहतूक / आर्थिक व गुन्हे शाखा / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / राज्य राखीव पोलीस बल /
महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग सह),
अपर पोलिस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
अपर पोलिस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य, पुणे,
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर,
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह),
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर,
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक,
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र (रा.रा.पो.बल. नानवीज सह) / अपारंपारिक अभियान प्रशिक्षण (UOTC), केंद्र, नागपूर,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९
कार्यालय अधीक्षक, का.क्र.-१९ अ. (पोमसं कार्यालय)

<u>प्रत, माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता सादर,</u>

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
पोलीस आयुक्त, मुंबई शहर
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२. यांना विनंती करण्यात येते की, शासन पत्र दि.११/०८/२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती शासनास परस्पर सादर करावी.

<u>प्रत:-</u>

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधीक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रकाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर फ्लॅश मध्ये "घरबांधणी / मोटार सायकल / संगणक प्रतिक्षा यादी आणि मंजूर यादी" या सदराखाली प्रसारित करण्यात यावी.

कार्यालय अधीक्षक, का.क्र.३६

<u>प्रत माहितीस्तव सादर,</u>

पोलीस महासंचालक यांचे उपसहायक र. व का. / लेखा

<u>प्रत सस्नेह सादर,</u>

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
(लक्षवेध :- अरविंद शेटे, उप सचिव, अर्थ-१)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२

**महत्वाचे**

दूरध्वनी क्र: ०२२-२२०२५१३२ Email ID: arvind.shete@nic.in

**क्र.बीजीटी-२०२५/प्र.क्र.०८/अर्थ-१** दिनांक: ११.०८.२०२५

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

**विषय - सर्व शासकीय कार्यालयांच्या विद्युत देयकांसंदर्भात Composite Billing प्रणाली राबविण्याबाबत**

महोदय,

केंद्र शासनाच्या उर्जा मंत्रालयाने त्यांच्या दि.०१.०७.२०२५ च्या पत्रान्वये, एकाच यंत्रणेतील विविध वीज ग्राहकांसाठी एकत्रित विद्युत देयक प्रणाली (Composite Bill) राबविण्याचे निर्देश दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या सदर निर्देशांच्या अनुषंगाने महावितरण (Maharashtra State Electricity Distribution Co Ltd.) यांनी एकत्रित विद्युत देयकाची रक्कम प्रदान करण्याबाबतची प्रणाली/योजना (Composite Bill Payment System) तयार केलेली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून शासकीय विभागातील विद्युत ग्राहक यांच्या करीता युनायटेड प्लॅटफॉर्म (United Platform) उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यान्वये विद्युत देयके पाहता येतील व त्याचे प्रदान करता येईल. या नव्याने निर्माण केलेल्या प्रणालीमुळे विद्युत देयके वेळेच्यावेळी प्रदान होतील व त्यामुळे विलंबीत आकार प्रदान करावा लागणार नाही. महावितरणाची ही प्रणाली पुणे महानगर पालिका व वसई विरार महानगर पालिका इ. निमशासकीय कार्यालयांमध्ये सुरु करण्यात आलेली आहे. सदरची प्रणाली राज्य शासनाच्या सर्व विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमध्ये सुरु करण्याच्या दृष्टीने मा. मुख्यमंत्री सचिवालयामध्ये दि.०५.०८.२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

२. महावितरण कंपनीने तयार केलेल्या या नवीन प्रणालीनुसार एकत्रित विद्युत देयके सादर करण्यासाठी प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त असलल्या विविध क्षेत्रीय कार्यालयांचे समुह (Group) तयार करुन, त्या समुहातील एका कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात यावे. त्या नोडल/ आहरण व संवितरण अधिकाऱ्यांमार्फत त्या समुहातील सर्व शासकीय कार्यालयांची विद्युत देयकांचे प्रदान करण्यात यावे व त्यासाठी विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयाचे कशाप्रकारे समुह



File No. DGP-D31/2/2025-DESK 31 (Computer No. 272156)
Generated from eOffice by ANANT BALIRAM KANSE, SR.CLRK(ABK)DESK31-DGPMS, SR. CLERK (DESK 31), DGPMS on 23/09/2025 05:39 pm

(Group) तयार करणे शक्य आहे, याबाबत विभागांनी आढावा/ पूर्वतयारी करुन ठेवावी, अशा सूचना दि.०५.०८.२०२५ रोजीच्या बैठकीत देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन वरीलप्रमाणे समुह (Group) कशाप्रकारे तयार करता येतील, याबाबतची प्राथमिक चर्चा आपल्या कार्यालयातील तसेच, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या कार्यालयातील लेखाविषयक कामकाज पाहणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याशी करण्यात आलेली आहे. आपल्या अधिनस्त तसेच पोलीस आयुक्त बृहन्मुंबई व जिल्हा स्तरावर कार्यरत क्षेत्रीय कार्यालयांचे कशाप्रकारे समुह (Group) तयार करता येतील याबाबतची माहिती तातडीने शासनास पाठविण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(अरविंद शेटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.